SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004,
दुरध्वनी – ईपीएबीएक्स – 2609000,
www.unishivaji.ac.in
Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52
विद्यार्थी विकास विभाग
Dr. T. M. Chougale
Director, Students' Development
Phone – (0231) 2609175, 2609475
Email: dsw@unishivaji.ac.in

संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/73 दि. ०९/०७/२०२५

**अत्यंत तातडीचे**

प्रति,
**मा. प्राचार्य/संचालक/समन्वयक**
सर्व संलग्न महाविद्यालये व
**मा. अधिविभागप्रमुख/संचालक/समन्वयक**
सर्व अधिविभाग, च
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय : युवा महोत्सव व अविष्कार संशोधन स्पर्धा माहिती कार्यशाळेसाठी गुगल लिंकद्वारा नोंदणी करणेबाबत.**

संदर्भ : १. या विभागाचे शिवाजी वि/विद्यार्थी विकास/६९ दि. ०४/०७/२०२५ रोजीचे पत्र
२. या विभागाचे शिवाजी वि/विद्यार्थी विकास/७० दि. ०४/०७/२०२५ रोजीचे पत्र

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये युवा महोत्सव व अविष्कार संशोधन स्पर्धाची माहिती देण्याच्या दृष्टीने विद्यार्थी विकास विभागामार्फत ज्या–त्या जिल्हयांसाठी संदर्भ कं. १ नुसार युवा महोत्सव जिल्हास्तरीय कार्यशाळा व संदर्भ कं २ नुसार अविष्कार संशोघन स्पर्धा जिल्हास्तरीय कार्यशाळा आयोजित करणेत आल्याचे व सदर कार्यशाळेमध्ये सहभागी होण्यासाठी गुगल लिंकद्वारा नोंदणीकरणेबाबत कळविण्यात आले आहे.

**युवा महोत्सव कार्यशाळेसाठी नोंदणी करण्याची अंतिम तारीख दि. १२/०७/२०२५ व अविष्कार संशोधन स्पर्धा कार्यशाळेसाठी नोंदणी करण्याची अंतिम तारीख दि. १८/०७/२०२५ असल्याचे कळविले आहे. परंतु अद्यापही ब–याच महाविद्यालयांनी गुगल लिंकद्वारा नोंदणी केलेली नाही. आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक नोंदणी न करता कार्यशाळेसाठी उपस्थित राहिले व त्याठिकाणी त्यांची चहा, अल्पोपहार व जेवण तसेच उपस्थिती प्रमाणपत्र मिळणेबाबत गैरसोय झाली तर यांची संपुर्ण जबाबदारी आपल्या महाविद्यालयाची असेल. याची कृपया नोंद घ्यावी.**

**सदर गुगल लिंकमध्ये नोंदणी महाविद्यालयातील ई–मेलद्वाराच करावयाची आहे. शिक्षकांच्या/विद्यार्थ्यांच्या मोबाईल कंमाक व ई–मेलवरुन नोंदणी करता येणार नाही याची नोंद घ्यावी.**

कळावे,

आपला विश्वासू,

संचालक
विद्यार्थी विकास

सोबत : युवा महोत्सव ऑनलाईन नोंदणी लिंक पत्र व अविष्कार संशोधन स्पर्धा ऑनलाईन नोंदणी पत्र

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004,
दुरध्वनी – ईपीएबीएक्स – 2609000,
www.unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

## विद्यार्थी विकास विभाग

Dr. T. M. Chougale
Director, Students' Development
Phone – (0231) 2609175, 2609475
Email: dsw@unishivaji.ac.in

संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/६९ दि. ०४/०७/२०२५

प्रति,

**मा. प्राचार्य/संचालक/समन्वयक**
सर्व संलग्न महाविद्यालये व
**मा. अधिविभागप्रमुख/संचालक/समन्वयक**
सर्व अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय : युवा महोत्सवाची माहिती विद्यार्थ्यांना होणेसाठी ज्या–त्या जिल्हयात जिल्हास्तरीय एकदिवसीय कार्यशाळा आयोजनाबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयान्वये, विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणेसाठी विद्यापीठामार्फत दरवर्षी युवा महोत्सवाचे आयोजन करणेत येते. तथापि सदर युवा महोत्सवाची माहिती होण्याचे दृष्टीने त्याचप्रमाणे सदर युवा महोत्सवामध्ये जास्तीत जास्त महाविद्यालयांनी सहभागी होणेच्या हेतूने तसेच युवा महोत्सवातील विविध कलाप्रकारांची शास्त्रशुध्द व तांत्रिक माहिती देण्याच्या दृष्टीने विद्यार्थी विकास विभागामार्फत ज्या–त्या जिल्हयांसाठी खालील महाविद्यालयांमध्ये जिल्हास्तरीय एक दिवशीय कार्यशाळा आयोजित करणेत आलेल्या आहेत. **सदर कार्यशाळा सकाळी ०९.०० ते ५.०० या वेळेत होणार आहेत.**

| अ. क्रं. | जिल्हा | आयोजक महाविद्यालयाचे नांव | दिनांक |
|---|---|---|---|
| १. | कोल्हापूर | दत्ताजीराव कदम कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, इचलकरंजी | १५ जूलै, २०२५ |
| २. | सांगली | विलिंग्डन कॉलेज, सांगली | १६ जूलै, २०२५ |
| ३. | सातारा | सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज | १८ जूलै, २०२५ |

तरी सदर एकदिवशीय कार्यशाळेसाठी ज्या–त्या जिल्हयाच्या ठिकाणी आपल्या महाविद्यालयातील ५ विद्यार्थी (विद्यार्थी व विद्यार्थीनी मिळून) व सांस्कृतिक विभाग पाहणारे दोन प्राध्यापक यांना पाठवून देवून सहकार्य करावे. तसेच **कार्यशाळेसाठी उपस्थित शिक्षक व विद्यार्थी यांची नावे खाली दिलेल्या गुगल फॉर्ममध्ये भरुन दि. १२/०७/२०२५ पर्यत कळविण्यात यावीत** ही विनंती. कार्यशाळेसाठी उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थी यांचा येण्या जाण्याचा खर्च ज्या–त्या महाविद्यालयाने करावयाचा आहे. सोबत कार्यक्रम पत्रिका जोडली आहे. कळावे,

गुगल लिंक : https://forms.gle/vejnmeuQtmFbWP9P9

आपला विश्वासू

प्र.संचालक
विद्यार्थी विकास

टिप: ज्या महाविद्यालयांना वरील ठिकाणी येणेस अडचण असेल त्यांनी वरील पैकी कोणत्याही एका जिल्हयातील सोईच्या ठिकाणी उपस्थित रहावे.

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## विद्यार्थी विकास विभाग

जिल्हास्तरीय युवा महोत्सव एकदिवशीय माहिती कार्यशाळा

**कार्यक्रम पत्रिका**

| तपशिल | वेळ |
|---|---|
| नोंदणी | सकाळी ९.०० ते १०.०० |
| उद्‌घाटन | सकाळी १०.०० ते ११.०० |
| पहिले सत्र | सकाळी ११.०० ते १२.०० |
| दुसरे सत्र | दुपारी १२.०० ते ०१.०० |
| तिसरे सत्र | दुपारी ०१.०० ते ०२.०० |
| भोजन | दुपारी ०२.०० ते ०३.०० |
| चौथे सत्र | दुपारी ०३.०० ते ०४.०० |
| पाचवे सत्र | सायंकाळी ०४.०० ते ०५.०० |
| समारोप | सायंकाळी ०५.०० ते ०५.१५ |

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**
416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004,**
दुरध्वनी – ईपीएबीएक्स – 2609000,
www.unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

# विद्यार्थी विकास विभाग

**Dr. T. M. Chougale**
**Director, Students' Development**
**Phone – (0231) 2609175, 2609475**
**Email: dsw@unishivaji.ac.in**

संदर्भ : जा. क्र.शिवाजी वि/ विद्यार्थी विकास /७० दि. ०४/०७/२०२५

प्रती,

३) मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त शिक्षण संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

४) मा. अधिविभाग प्रमुख / संचालक/ समन्वयक
सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय : **अविष्कार संशोधन स्पर्धेची माहिती विद्यार्थ्यांना होणेसाठी ज्या त्या जिल्ह्यात जिल्हास्तरीय एकदिवशीय कार्यशाळा आयोजनाबाबत .....**

महोदय / महोदया,

उपरोक्त विषय संदर्भात जिल्हास्तरीय व विद्यापीठ स्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धा २०२५ – २०२६ चे ऑक्टोबर २०२५ मध्ये आयोजन करण्यात येणार आहे. या अनुषंगाने विद्यार्थ्यांना अविष्कार संशोधन स्पर्धेचे नियम व इतर अनुषंगिक माहिती होण्यासाठी या विभागामार्फत कोल्हापूर, सांगली व सातारा या तीन जिल्ह्यामध्ये खालील तक्त्यात नमूद केलेल्या महाविद्यालयामध्ये अविष्कार कार्यशाळेचे आयोजन केले आहे. **सदर कार्यशाळा सकाळी ०९.०० ते सांयकाळी ५.०० या कालावधीत** होणार आहे.

| अ.क्र. | जिल्हा | आयोजक महविद्यालयाचे नाव | दिनांक |
|---|---|---|---|
| १. | कोल्हापूर | भोगावती महाविद्यालय, कुरुकली | २१ जुलै, २०२५ |
| २. | सांगली | वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सांगली | २२ जुलै, २०२५ |
| ३. | सातारा | यशोदा टेक्नीकल कॅम्पस, सातारा | २३ जुलै, २०२५ |

तरी सदर एकदिवशीय कार्यशाळेसाठी ज्या त्या जिल्ह्याच्या ठिकाणी आपल्या महाविद्यालयातील सहा विद्यार्थी (विद्यार्थी व विद्यार्थिनी मिळून) व अविष्कार काम पाहणारे दोन शिक्षक यांना उपस्थित रहाणेबाबत सांगण्यात यावे. सदर दोन शिक्षकामधील एक शिक्षक अविष्कार समन्वयक असणे आवश्यक आहे. आपल्या महाविद्यालयात ज्या शाखा शिकवल्या जातात, त्या प्रत्येक शाखेतील एक ते दोन विद्यार्थी कार्यशाळेसाठी घेण्यात यावेत. कार्यशाळेसाठी उपस्थित शिक्षक व विद्यार्थी यांची नावे खाली दिलेल्या **गुगल फॉर्ममध्ये दि. १८/०७/२०२५** पर्यंत भरण्यात यावीत हि विनंती. अविष्कार कार्यशाळेसाठी उपस्थित रहाणेसाठीचा प्रवास खर्च ज्या त्या महाविद्यालयांनी करणेचे आहे.

गुगल लिंक : https://forms.gle/LWMaYFWtcjm9cFSLA

कळावे,

आपला विश्वासू
प्र संचालक
विद्यार्थी विकास

टिप : ज्या महाविद्यायांना वरील ठिकाणी येणेस अडचण असेल त्यांनी वरील पैकी कोणत्याही एका जिल्ह्यातील सोईच्या ठिकाणी उपस्थित रहावे.

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
# विद्यार्थी विकास विभाग

## जिल्ह्यास्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धा माहिती कार्यशाळा
# कार्यक्रम पत्रिका

| तपशील | वेळ |
|---|---|
| नोंदणी | सकाळी ०९. ०० ते १०.०० |
| उद्घाटन | सकाळी १०.०० ते ११.०० |
| पहिले सत्र | सकाळी ११.०० ते १२.०० |
| चर्चा | दुपारी १२.०० ते १२.१५ |
| दुसरे सत्र | दुपारी १२.१५ ते ०१.१५ |
| चर्चा | दुपारी ०१.१५ ते ०१.३० |
| भोजन | दुपारी ०१.३० ते ०२.३० |
| तिसरे सत्र | दुपारी ०२.३० ते ०३.१५ |
| चर्चा | दुपारी ०३.१५ ते ०३.३० |
| तिसरे सत्र | दुपारी ०३.३० ते ०४.१५ |
| चर्चा | सायंकाळी ०४.१५ ते ०४.३० |
| समारोप | सायंकाळी ०४.३० ते ०५.०० |

— ० —